# प्रास्ताविक

श्रेष्ठ मराठी साहित्यिक विंदा करंदीकरांना २००३ सालचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार २००६ साली घोषित झाला हे वाचून मला खूप आनंद झाला. वृत्तपत्रे, मासिके, दूरदर्शन, रेडिओ इ. माध्यमाद्वारे त्यांचे श्रेष्ठत्व समजले. त्याचवेळेस करंदीकरांविषयी खूप आदर निर्माण झाला व त्यांचे साहित्य अभ्यासावे अशी इच्छा माझ्या मनात निर्माण झाली.

एखाद्या लेखकाची साहित्यकृती समजावून घेत असताना त्या लेखकाचे अल्पचरित्र थोडे तरी माहीत असणे आवश्यक असते. मला करंदीकरांचे साहित्य वाचावेसे वाटत होते. त्याचवेळी सुमा करंदीकरांचे 'रास' हे पुस्तक माझ्या वाचनात आले आणि त्यातून करंदीकरांविषयी, त्यांच्या स्वभावाविषयी त्यांचे वाङ्मयीन लेखन, त्यांना मिळालेले पुरस्कार आणि त्यांच्या वैयक्तिक, कौटुंबिक जीवनाविषयी माहिती मिळाली.

करंदीकरांच्या काही कविता शालेय पाठ्यपुस्तकातून अभ्यासल्या होत्या. कला संगीत या विषयात त्यांच्या बालकविता वाचलेल्या आहेत. काही पाठही आहेत. परंतु काव्य हा साहित्यप्रकार सोडून साहित्याच्या इतर प्रांतातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे ती जाणून घेण्याची ओढ निर्माण झाली.

पुढे एम्.फिल पदवी परीक्षेच्या प्रबंधिकेसाठी विषय निवडण्याची वेळ आली तेव्हा विजया राजाध्यक्ष यांनी संपादन केलेल्या करंदीकरांच्या लघुनिबंधांचे 'करंदीकरांचे समग्र लघुनिबंध' हे पुस्तक वाचनात आले. त्यातील लघुनिबंध मला एवढे आवडले की आपण करंदीकरांच्या लघुनिबंधांविषयी संशोधन करावे असे वाटले आणि योगायोगाने माझ्या मार्गदर्शिका प्रा.डॉ.सौ. भुतकर मॅडम यांनी हा विषय सुचविला. या दुग्धशर्करा योगामुळेच मी ही प्रबंधिका यशस्वीरित्या पूर्ण करू शकेन अशी आशा मला वाटली. त्यामुळेच मी ''विंदा करंदीकरांच्या लघुनिबंधांचा विवेचक अभ्यास'' (''स्पर्शाची पालवी'' आणि ''आकाशाचा अर्थ'' यांच्या अनुषंगाने) हा विषय निवडला. जणू माझ्या मनातील अंकुराला नवी पालवी फुटली.

हा विषय निवडण्यामागे आणखी एक महत्त्वाची भूमिका म्हणजे असामान्य कर्तृत्त्व गाजविणारी व्यक्ती स्वत:ला सामान्य समजते. सामान्य माणूस हाच त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे ते आपल्यातीलच एक वाटतात व त्यांच्याविषयी आदर, प्रेम द्विगुणीत होते. जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन साध्या साध्या प्रसंगातून, विषयातून करंदीकरांनी पटवून दिला आहे.

सामाजिक बांधिलकीची जाण ठेवून पुरस्कारातून मिळालेली सर्व रक्कम करंदीकरांनी सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना दान केली. पैशाच्या श्रीमंतीपेक्षा मनाची श्रीमंती मोठी असते. हे सिद्ध करतानाही आपण असामान्य आहोत हे जाणवून दिले नाही. समाजाने पुरस्काराच्या रूपाने दिलले पैसेच मी पुन्हा समाजाला दिले आहेत असे ते मानतात.

करंदीकरांचे व्यक्तिमत्त्व उत्तुंग आहे, त्यांचे दातृत्वही अतुलनीय आहे. कवी, लघुनिबंधकार, समीक्षक, भाषांतरकार इ. साहित्याच्या क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल समाजाने त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानीत केलेले आहे. कवी म्हणून विंदा करंदीकर हे तर सर्व परिचित आहेतच परंतु लघुनिबंधकार गो.वि. करंदीकर हे त्यांच्या लघुनिबंधातून अधिकाधिक उलगडत जावेत म्हणून मी ''विंदा करंदीकरांच्या लघुनिबंधांचा विवेचक अभ्यास'' हा विषय निवडला.

# ऋणनिर्देश

प्रस्तुत प्रबंधिकेचे लेखन करताना मला अनेकांचे विविध प्रकारे सहकार्य लाभले. असे प्रेमळ व निरपेक्ष सहकार्य लाभणे ही मोठ्या भाग्याची गोष्ट आहे.

माझ्या अभ्यासाला दिशा देणाऱ्या व माझ्यावर अपार ऋण असणाऱ्या माझ्या मार्गदर्शक गुरू प्रा.डॉ.सौ. शुभांगी शशिकांत भुतकर यांनी मला विषय निवडीपासून ते लेखन पूर्ण होईपर्यंत बहुमोल असे मार्गदर्शन केले. मार्गदर्शनाबरोबरच अनेक संदर्भ उपलब्ध करून देण्यापर्यंत अनेक गोष्टीत त्यांनी मला सहकार्य केले आहे. कोणत्याही वेळी मी मॅडमकडे गेले तरी त्यांनी उत्स्फूर्त मार्गदर्शन केले. हे मार्गदर्शन केवळ अभ्यासापुरतेच मर्यादित नसून त्याचा मला भावी जीवनातही फार उपयोग होईल असेच आहे. आपले घर विद्यादानासाठी खुले ठेवणाऱ्या मार्गदर्शक गुरूंचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणातच सदैव राहणे मला आनंददायक होणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातील १) डॉ. कृष्णा किरवले, २) डॉ. विश्वनाथ शिंदे, ३) डॉ. रवींद्र ठाकूर यांनी मला मोलाचे मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांची मी विशेष आभारी आहे.

छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य जे.जी. जाधव, प्राचार्य शशिकांत नारायण भुतकर, छ. शिवाजी कॉलेजमधील मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांनी मला मार्गदर्शन व सहकार्य केले. या सर्वांचे ऋण न फिटण्यासारखे आहे.

माझे आई वडील श्री. ज्ञानदेव पंढरीनाथ वणवे आणि सौ. सुनंदा हे दोघेही शिक्षणप्रेमी. वडील स्वत: शिक्षक तर आई शिक्षकाची मुलगी त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटले होते. आपल्या मुलांनी खूप शिकावे अशी त्यांची मनापासून इच्छा. त्यामुळे आम्ही चारही भावंडे उच्चशिक्षित आहोत. त्यांच्या आशीर्वादाचा हात पाठीवरून फिरत राहिल्यामुळेच मी उच्चशिक्षणापर्यंतचा प्रवास करू शकले. तेव्हा आयुष्यभर मला त्यांच्या ऋणातच राहणे अधिक आवडेल.

माझे परमपूज्य सासरे श्री. विष्णू शंकर गंबरे व सासूबाई सौ. पार्वतीबाई यांनाही माझा खूप अभिमान आहे. माझ्या सुनेने शिक्षण क्षेत्रात उज्ज्वल यश मिळवावे असे त्यांना नेहमी वाटे. त्यांचेही

आशीर्वाद माझ्या या कार्यामध्ये मला आहेत. माझ्या नणंदबाई सौ. सुनिता नंदकुमार माळवे यांनी मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले व अभ्यासास प्रवृत्त केले.

लग्नानंतर बी.ए., एम्.ए व आता एम.फिल पर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यास सदैव प्रेरणा देणारे व उत्साह वाढविणारे माझे पती ॲड. श्री. रमेश विष्णू गंबरे, विस्तार अधिकारी, शिक्षण विभाग, जि.प. सातारा हेच मुळी अभ्यासू व्यक्तिमत्त्व,नोकरी सांभाळून सतत शैक्षणिक उंची वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असतो. त्यांच्या ज्ञानचा उपयोग मला संशोधन कार्य करताना झाला. संदर्भग्रंथ उपलब्ध करून देणे, वेळोवेळी चर्चा व मार्गदर्शन करणे, कॉलेज व ग्रंथालयात जाण्यास प्रवृत्त करणे, त्याचप्रमाणे कामाचा व्याप सांभाळून मुलीची काळजी घेऊन सहकार्य केल्यामुळेच मी हे संशोधन पूर्ण करू शकले. त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक ऋण व्यक्त करते. माझी कन्या कु. संज्योत स्वत: ५ वर्षाची असल्यापासून मला अभ्यासाला वेळ देत आहे. त्याबद्दल मी तिच्याविषयी वात्सल्य, प्रेम व्यक्त करते.

माझे दीर श्री. दिलीप विष्णू गंबरे व जाऊबाई सौ. स्मिता यांनीही संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून दिले व त्या संदर्भात चर्चाही केल्या त्या फारच उपयुक्त ठरल्या.

माझे स्फूर्तिस्थान माझे बंधू सचिन, बाबासो, रामभाऊ, तुषार यांनाही आपल्या बहिणीने शिक्षणक्षेत्रात प्रगती करावी असे वाटत होते. हे अल्पसे संशोधन करण्याच्या कामी त्यांनी मला नेहमीच प्रोत्साहित केले व पाठबळ दिले.

माझ्या बहिणी सौ. ज्योती परशुराम सोनावणे, सौ. जयश्री सतीश चौधर आणि सौ. स्वाती लक्ष्मण गंबरे, कु. तेजल यांनी परीक्षा काळात व संशोधनाच्या वेळेत अभ्यासात व गृहकर्तव्यात मला मदत करून विशेष असे सहकार्य केले. त्यांच्याविषयी मी कृतज्ञता व्यक्त करते.

वेळात वेळ काढून माझ्या संशोधनास शुभचिंतन व मार्गदर्शन करणारे श्री. विंदा करंदीकर व त्यांच्या पत्नी सौ. सुमा करंदीकर यांचेही मी मनापासून आभार मानते आणि ऋण व्यक्त करते.

छत्रपती शिवाजी कॉलेजचे शिवाजी ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, नगर वाचनालय, सातारा, दहिवडी कॉलेजचे ग्रंथालय, महाराष्ट्र साहित्य

परिषद, पुणे, क्षेत्रपाल विद्यालय अडूळचे ग्रंथालय यांचा मला बहुमोल उपयोग झाला. या सर्वांचे मी मनापासून आभार मानते.

या प्रबंधाचे अत्यंत तत्परतेने टंकलेखन व प्रबंधाची सुबक बांधणी करून देणारे शितल एंटरप्रायजेसचे योगेश सुरेश भस्मे यांचीही मी आभारी आहे.

या सर्वांखेरीज ज्यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे या कार्यास हातभार लागला परंतु नामनिर्देश करण्याचे राहिले आहे अशा सर्वांचे मी हार्दिक आभार मानते.